# जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधित पदभरती - २०२१

## ४% प्रमाणे सुधारीत आरक्षणानुसार दिव्यांगांसाठी उपलब्ध होणारी पदे तसेच खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षणात वाढ झालेली पदे भरण्यासाठीची जाहिरात

**जाहिरात क्रमांक ०१/२०२१ दिनांक :- २५.०८.२०२१**

केंद्र शासनाची दिनांक ४ जानेवारी, २०२१ रोजीची अधिसूचना व सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक २१ जानेवारी, २०२१ च्या शासन निर्णयास अनुसरुन ग्राम विकास विभागाने दिव्यांगांसाठी पद सुनिश्चितीचा शासन निर्णय दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१ रोजी निर्गमित केला आहे. ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.९९/आस्था ८, दिनांक १४ जून, २०२१ अन्वयें माहे मार्च, २०१९ च्या जाहिरातीमध्ये दिलेल्या आरोग्य विभागाशी संबंधित संवर्गातील दिव्यांगांच्या प्रवर्गाव्यतिरिक्त शासन निर्णय, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१ अन्वयें नव्याने समाविष्ट झालेल्या दिव्यांगांच्या प्रवर्गातील पदे नामनिर्देशनाने भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास प्रवर्गाचे (एसईबीसी) आरक्षण रद्द झाले असल्याने सदर प्रवर्गातील राखीव जागा आराखीव (खुला) जागेमध्ये रुपांतरीत झाल्या आहेत. सदर समांतर आरक्षणामध्ये वाढ किंवा घट करण्यास महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील दिनांक २५.०६.२०२१ चे पत्रान्वयें मान्यता देण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील दिनांक २०.०८.२०२१ चे पत्र व दिनांक २०.०८.२०२१ चे शासन शुध्दीपत्रकान्वयें दिव्यांगाच्या नवीन प्रवर्गासाठी तसेच खुल्या प्रवर्गात नव्याने वाढ झालेल्या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गासाठी जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता देणेत आली आहे.

त्याअनुषंगाने जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधित गट "क" चे संवर्गातील परिच्छेद ३ मध्ये नमूद सरळसेवेने भरावयाच्या पदांकरीता अर्हता प्राप्त पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत असून खाली नमूद केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे विहित अर्हताधारक पात्र उमेदवारांनी www.maharddzp.com या संकेतस्थळावर आपले अर्ज सादर करावेत.

जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधित गट "क" चे संवर्गातील खालील कोष्टक ३ मध्ये नमूद केलेप्रमाणे सरळसेवेने भरावयाच्या पदांकरीता अर्हता प्राप्त पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच www.maharddzp.com या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत. पदभरतीसाठी सुधारीत पदनिहाय आरक्षणाचा तपशिल परिच्छेद ३ मधील विवरणपत्रात नमूद करणेत आलेला आहे.

**१) अर्ज करण्याची पध्दत**

| | |
|---|---|
| १ | प्रस्तुत परीक्षेकरीता फक्त ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज स्विकारण्यात येतील. |
| २ | पात्र उमेदवारांना वेब आधारीत (Web-based) ऑनलाईन अर्ज www.maharddzp.com या संकेतस्थळाद्वारे खालील कालावधीतच करणे आवश्यक राहिल. |
| ३ | माहे मार्च २०१९ मध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी जाहिर प्रकटनात नमूद केलेप्रमाणे विकल्प देणेचा कालावधी - दिनांक ०१.०९.२०२१ ते दिनांक १४.०९.२०२१ |
| ४ | जाहिरातीत नमूद पदांकरीता ऑनलाईन अर्ज स्विकारण्याचा दिनांक - दिनांक ०१.०९.२०२१ ते दिनांक २१.०९.२०२१ |

**२) परीक्षा शुल्क**

| | | |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय उमेदवार | रु.२५०/- |
| २ | सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार | रु.५००/- |

सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात www.maharddzp.com व www.ratnagiri.nic.in तसेच www.ratnagiri.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी जाहिरातीत नमूद संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचून ऑनलाईन (online) पध्दतीनेच www.maharddzp.com या संकेतस्थळावर आपले अर्ज सादर करावेत. सदर संकेतस्थळाला भरतीप्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेसंबंधी आवश्यक अद्यावत माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, परीक्षेचा प्रकार, विहित आरक्षणात अंशत:/पूर्णत: बदल करणे, संवर्गनिहाय एकूण रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिया संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकरण तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांना असतील. अनुकंपा पदभरती, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून १० टक्के नामनिर्देशनाने करावयाची भरती अथवा इतर कोणत्याही प्रशासकीय कारणांमुळे जाहिरातीत नमूद पदे कमी किंवा जास्त होऊ शकतात. त्याबाबत उमेदवारास अथवा इतर कोणासही कोणताही दावा करता येणार नाही.

**३) जिल्हा परिषद रत्नागिरी सरळसेवा भरती - सन २०२१ अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधित भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

**अ) दिव्यांगाच्या नवीन प्रवर्गातील भरावयाच्या पदांचा तपशिल.**

<table>
<tr><th rowspan="2">अ. क्र.</th><th rowspan="2">संवर्ग</th><th colspan="10">दिव्यांगासाठी राखीव असलेली एकूण पदे</th><th rowspan="2">दिव्यां-गाचा प्रवर्ग</th><th rowspan="2">दिव्यांगाचा प्रकार</th><th rowspan="2">पद संख्या</th></tr>
<tr><th>अ. जा</th><th>अ. ज.</th><th>वि. जा. (अ)</th><th>भ. ज. (ब)</th><th>भ. ज. (क)</th><th>भ. ज. (ड)</th><th>इ मा व</th><th>वि मा प्र</th><th>इ डब्ल्यू एस</th><th>खुला</th></tr>
<tr><td>१</td><td>औषध निर्माता</td><td colspan="10">१</td><td>ब</td><td>कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता<br>Deaf (D), Hard of hearing (HH)</td><td>१</td></tr>
<tr><td>२ अ</td><td>आरोग्य सेवक (पुरुष) ५०% (हंगामी क्षेत्र फवारणी पुरुष कर्मचारी यांचे मधून)</td><td colspan="10">१</td><td>अ</td><td>अल्पदृष्टी<br>Low Vision (LV)</td><td>१</td></tr>
<tr><td>२ ब</td><td>आरोग्य सेवक (पुरुष) ४०% (सर्वसाधारण उमेदवारां मधून)</td><td colspan="10">१</td><td>अ</td><td>अल्पदृष्टी<br>Low Vision (LV)</td><td>१</td></tr>
<tr><td rowspan="5">३</td><td rowspan="5">आरोग्य सेवक (महिला)</td><td colspan="10" rowspan="5">५</td><td>अ</td><td>अल्पदृष्टी<br>Low Vision (LV)</td><td>१</td></tr>
<tr><td>ब</td><td>कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता<br>Deaf (D), Hard of hearing (HH)</td><td>१</td></tr>
<tr><td>क</td><td>मेंदूचा पक्षघात Cerebral Palsy (CP)<br>कुष्ठरोग मुक्त Leprosy Cured (LC)<br>शारिरीक वाढ खुंटणे Dwarfism (Dw)<br>आम्ल हल्लाग्रस्त Acid Attack Victims (AAV)</td><td>१</td></tr>
<tr><td>ड</td><td>विशिष्ट शिक्षण अक्षमता Specific learning Disability (SLD)<br>मानसिक आजार Mental illness (MI)</td><td rowspan="2">२</td></tr>
<tr><td>इ</td><td>वरील अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यासाठी Multiple Disabilities (MD) Involving (a) to (d) above</td></tr>
</table>

टिप :-   १) वरील कोष्टकात नमूद पदांपैकी अ.क्र.२ अ) व २ ब) या पदांसाठी फक्त पुरुष उमेदवार तसेच अ.क्र. ३ आरोग्य सेवक (महिला) या पदांसाठी फक्त महिला उमेदवारच अर्ज करु शकतील.

**२) नव्याने समाविष्ठ झालेल्या दिव्यांगाच्या प्रवर्गातील उमेदवाराने जर या पूर्वी माहे मार्च, २०१९ मध्ये प्रसिध्द जाहिरातीनुसार खुल्या अथवा इतर प्रवर्गातून अर्ज केला असल्यास सदर उमेदवारास दिव्यांग आरक्षणाचा विकल्प दि.१ सप्टेंबर, २०२१ ते दि.१४ सप्टेंबर, २०२१ या कालावधीत www.maharddzp.com या संकेतस्थळावर देणे आवश्यक असेल. तसेच यापूर्वी अर्ज सादर केलेल्या दिव्यांग उमेदवारांनी दिव्यांगाच्या पदनिहाय आरक्षणात बदल होत असल्याने दिव्यांगांकरीता नव्याने प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार विकल्प दि.१ सप्टेंबर, २०२१ ते दि.१४ सप्टेंबर, २०२१ या कालावधीत www.maharddzp.com या संकेतस्थळावर देणे आवश्यक असेल.**

**ब)** रत्नागिरी जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडील १) औषध निर्माता, २) आरोग्य सेवक (पुरुष) (५०%) (हंगामी क्षेत्र फवारणी पुरुष कर्मचारी यांचेमधून), आरोग्य सेवक (पुरुष) ४०% (सर्वसाधारण उमेदवारांमधून), ३) आरोग्य सेवक (महिला) व ४) आरोग्य पर्यवेक्षक या ४ संवर्गाच्या पदासाठी जाहिरात देणेत आलेली होती. त्यामध्ये एसईबीसी, खुला प्रवर्गाची पदे घोषित करणेत आलेली होती. मात्र सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास प्रवर्गाचे (एसईबीसी) आरक्षण रद्द झाले असल्याने सदर प्रवर्गातील राखीव जागा अराखीव जागेमध्ये (खुला) रुपांतरीत झाल्या आहेत. **त्यामुळे खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षणामध्ये वाढ किंवा घट झालेली असल्याने माहे मार्च २०१९ चे जाहिरातीतील खुल्या प्रवर्गाच्या दर्शविलेल्या पदास अनुसरुन नव्याने वाढ झालेल्या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातून भरावयाच्या पदांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.**

**१) औषध निर्माता**

| प्रवर्ग | खुला | एकूण पदे |
|---|---|---|
| **पदसंख्या** | **३** | **३** |
| सर्वसाधारण | ३ | **३** |
| **एकूण** | **३** | **३** |

**२ अ. आरोग्य सेवक (पुरुष) ५०% (हंगामी क्षेत्र फवारणी पुरुष कर्मचारी यांचेमधून)**

| प्रवर्ग | खुला | एकूण पदे |
|---|---|---|
| **पदसंख्या** | **७** | **७** |
| सर्वसाधारण | ५ | **५** |
| अंशकालीन | १ | **१** |
| माजी सैनिक | १ | **१** |
| **एकूण** | **७** | **७** |

**२ ब. आरोग्य सेवक (पुरुष) ४०% (सर्वसाधारण उमेदवारांमधून)**

| प्रवर्ग | खुला | एकूण पदे |
|---|---|---|
| **पदसंख्या** | **४** | **४** |
| सर्वसाधारण | ४ | **४** |
| **एकूण** | **४** | **४** |

३.  **आरोग्य सेवक (महिला)**

| प्रवर्ग | खुला | एकूण पदे |
|---|---|---|
| **पदसंख्या** | **२** | **२** |
| अंशकालीन | २ | **२** |
| **एकूण** | **२** | **२** |

४.  **आरोग्य पर्यवेक्षक**

| प्रवर्ग | खुला | एकूण पदे |
|---|---|---|
| **पदसंख्या** | **१** | **१** |
| सर्वसाधारण | १ | **१** |
| **एकूण** | **१** | **१** |

**टिप :- सदर समांतर आरक्षणाच्या बदलामुळे वाढलेल्या प्रवर्गाच्या उमेदवाराने यापूर्वी खुल्या अथवा इतर प्रवर्गात अर्ज सादर केला असल्यास सदर उमेदवारास नव्याने वाढलेल्या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गाचा विकल्प दि.१ सप्टेंबर, २०२१ ते दि.१४ सप्टेंबर, २०२१ या कालावधीत www.maharddzp.com या संकेतस्थळावर देणे आवश्यक असेल.**

**४.  माहे मार्च, २०१९ च्या जाहिरातीमधील रद्द झालेल्या प्रवर्गामधून यापूर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी इतर जिल्हा परिषदेचा विकल्प दि.१ सप्टेंबर, २०२१ ते दि.१४ सप्टेंबर, २०२१ या कालावधीत www.maharddzp.com या संकेतस्थळावर देणे आवश्यक राहील.**

**रत्नागिरी जिल्हा परिषदेअंतर्गत माहे मार्च, २०१९ च्या जाहिरातीमधील रद्द झालेल्या प्रवर्गाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | पद | प्रवर्ग | समांतर आरक्षण | रद्द झालेली पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| **१** | **आरोग्य सेवक (पुरुष) ४०% (सर्वसाधारण उमेदवारांमधून)** | **अनु.जाती** | **माजी सैनिक** | **१** |
| **२** | **आरोग्य पर्यवेक्षक** | **इ.मा.व.** | **सर्वसाधारण** | **१** |
| | **एकूण** | | | **२** |

**वरील कोष्टक क्र.३ अ व ब मधील नमूद पदांकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुषंगिक बाबींचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

## परिशिष्ट -अ

### पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता व परिक्षेचे वेळापत्रक

| अ. क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता व अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | औषध निर्माता | एस -१० २९२००-९२३०० | औषध निर्माण शास्त्रातील पदवी किंवा पदवीका धारण करणारे आणि औषध शास्त्र अधिनियम १९४८ खालील नोंदणीकृत औषध निर्माते असलेले उमेदवार. | |
| २ अ | आरोग्य सेवक (पुरुष) ५०% (हंगामी क्षेत्र फवारणी कर्मचारी) | एस - ८ २५५००-८११०० | विज्ञान विषय घेवून माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार. राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून ९० दिवसांचा फवारणी कामाचा अनुभव आवश्यक.<br>ज्यांनी बहुउद्देशिय आरोग्य कर्मचा-यांसाठी असणारा १२ महिन्याचा मुलभूत पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला नसेल अशा उमेदवारांनी नियुक्ती नंतर असे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहिल. | |
| २ ब | आरोग्य सेवक (पुरुष) ४०% (सर्वसाधारण उमेदवारांमधून) | एस - ८ २५५००-८११०० | विज्ञान विषय घेवून माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार. ज्यांनी बहुउद्देशिय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारा १२ महिन्याचा मुलभूत पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला नसेल अशा उमेदवारांनी नियुक्ती नंतर असे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहिल. | |

| अ. क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता व अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|
| ३ | आरोग्य सेवक (महिला) | एस - ८<br>२५५००-८११०० | अर्हता प्राप्त साहयकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील. | |
| ४ | आरोग्य पर्यवेक्षक | एस-१३<br>३५४००-११२४०० | ज्यांनी मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी धारण केलेली असेल आणि ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचा-यांसाठी असणारा १२ महिन्याचा पाठयक्रम यशस्वीरित्या पुर्ण केलेला असेल अशा उमेदवारामधुन नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करण्यात येईल. | |

**वरील सर्व पदांसाठी आवश्यक सामाईक अर्हता खालीलप्रमाणे असेल.**

| अ.क्र. | सामाईक अर्हता | तपशिल |
|---|---|---|
| १ | संगणक अर्हता | **सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदी नुसार (अ) D.O.E.A.C.C सोसायटीच्या CCC किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (साप्रवि), विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंस २०१५/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ०४.०२.२०१३ व शासन पुरकपत्र क्र.मातंस २०१२/प्र.क्र.२७०/३९ दिनांक ०८.०१.२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता विहित मुदतीत प्राप्त करणे बंधनकारक आहे.** |
| २ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | **महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील तरतुदीनुसार शासकीय सेवेतील भरतीमध्ये विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्ती वेळेस हजर होतांना विवाहित उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहील.**<br>**प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल.** |

**वरील सर्व पदांसाठी परीक्षेचे स्वरुप व दर्जा :**

**<u>- वरील सर्व पदांकरीता ऑफलाईन पध्दतीने परीक्षा घेतली जाईल.</u>**

| अ. क्र. | पदाचे नाव/ संवर्ग | भाग-१ इंग्रजी | भाग-२ मराठी | भाग-३ सामान्य ज्ञान | भाग-४ तर्कक्षमता/ अनुमानात्मक चाचणी | भाग-५ तांत्रिक | एकूण प्रश्न | एकूण गुण | नकारात्मक गुणदान | परीक्षेचा कालावधी (मिनिटे) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | | | | |
| १) | **औषध निर्माता** | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | **नाही** | ९० **मि.** |
| | **काठिण्य पातळी** | **इ.१० वी** | **इ.१० वी** | **इ.१० वी** | **इ.१० वी** | **पदविका दर्जा** | | | | |
| | **प्रश्न पत्रिकेचे माध्यम** | **इंग्रजी** | **मराठी** | **इंग्रजी व मराठी** | **इंग्रजी व मराठी** | **इंग्रजी** | | | | |
| २ अ) | **आरोग्य सेवक (पुरुष) ५०% (हंगामी क्षेत्र फवारणी कर्मचारी)** | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | **नाही** | ९० **मि.** |
| | **काठिण्य पातळी** | **इ.१० वी** | **इ.१० वी** | **इ.१० वी** | **इ.१० वी** | **इ.१० वी** | | | | |
| | **प्रश्न पत्रिकेचे माध्यम** | **इंग्रजी** | **मराठी** | **इंग्रजी व मराठी** | **इंग्रजी व मराठी** | **इंग्रजी व मराठी** | | | | |

| अ. क्र. | पदाचे नाव/ संवर्ग | भाग-१ इंग्रजी | भाग-२ मराठी | भाग-३ सामान्य ज्ञान | भाग-४ तर्कक्षमता/ अनुमानात्मक चाचणी | भाग-५ तांत्रिक | एकूण प्रश्न | एकूण गुण | नकारात्मक गुणदान | परीक्षेचा कालावधी (मिनिटे) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | एकूण प्रश्न | | | | |
| २ ब) | **आरोग्य सेवक (पुरुष) ४०% (सर्वसाधारण उमेदवारांमधून)** | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | **नाही** | ९० मि. |
| | **काठिण्य पातळी** | **इ.१० वी** | **इ.१० वी** | **इ.१० वी** | **इ.१० वी** | **इ.१० वी** | | | | |
| | **प्रश्न पत्रिकेचे माध्यम** | **इंग्रजी** | **मराठी** | **इंग्रजी व मराठी** | **इंग्रजी व मराठी** | **इंग्रजी व मराठी** | | | | |
| ३) | **आरोग्य सेवक (महिला)** | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | **नाही** | ९० मि. |
| | **काठिण्य पातळी** | **इ.१० वी** | **इ.१० वी** | **इ.१० वी** | **इ.१० वी** | **इ.१० वी** | | | | |
| | **प्रश्न पत्रिकेचे माध्यम** | **इंग्रजी** | **मराठी** | **इंग्रजी व मराठी** | **इंग्रजी व मराठी** | **इंग्रजी व मराठी** | | | | |
| ४) | **आरोग्य पर्यवेक्षक** | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | **नाही** | ९० मि. |
| | **काठिण्य पातळी** | **पदवी** | **इ.१२ वी** | **पदवी** | **पदवी** | **पदवी** | | | | |
| | **प्रश्न पत्रिकेचे माध्यम** | **इंग्रजी** | **मराठी** | **इंग्रजी व मराठी** | **इंग्रजी व मराठी** | **इंग्रजी व मराठी** | | | | |

**(१) परीक्षेचा दर्जा / स्तर**

१. परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा त्या त्या पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या दर्जापेक्षा निम्न असणार नाही.
२. ज्या पदांकरिता पदवी ही कमीतकमी अर्हता आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) दर्जाच्या समान राहील.

**(२) परीक्षेद्वारे निवडीची कार्यपध्दती**

सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक १३ जून २०१८ नुसार गट-क संवर्गातील पदे भरतांना खालील कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.
१. गट क मधील सर्व पदांकरीता उमेदवारांची निवड करतांना २०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल.
२. अशा परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे किमान ४५% गुण मिळविणाऱ्या उमेदवारांमधून निवड सूची तयार करण्यात येईल.
३. औषध निर्माता या तांत्रिक संवर्गातील पदांच्या तांत्रिक भागाचे प्रश्न इंग्रजी माध्यमातून राहतील.

### (३) निवडसूची व तीची कालमर्यादा

निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करतांना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

### (४) समान गुण असल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती

सामान्य प्रशासन विभाग शासन पूरकपत्र क्रमांक : प्रानिमं-१२१७/(प्र.क्र.९२/१७)/१३-अ दिनांक ०२ डिसेंबर, २०१७ व सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं १२१६/((प्र.क्र.६५/१६)/१३-अ दिनांक १३ जून, २०१८ अन्वयें परीक्षेचा निकाल तयार करताना परीक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल.

| |
|---|
| **अ) आत्महत्याग्रस्त** शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. |
| **ब)** वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| **क)** समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतम शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.) |
| **ड)** वरील प्रमाणे दोन्ही अटी समान ठरत असल्यास उमेदवाराच्या बाबतीत, सदर पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |

### (५) सर्वसाधारण सूचना

उमेदवारांना परीक्षे करीता अर्ज सादर करीत असतांना कोणतेही कागदपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही. कागदपत्र पडताळणीच्या प्रक्रिये वेळी पदाकरीता आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.

| सर्वसाधारण अटी व शर्ती | शेरा |
|---|---|
| अ) उमेदवार भारताचा नागरीक असावा | |
| ब) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. | डोमीसाईल प्रमाणपत्र आवश्यक. |
| क) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.मकसी १००७/प्र.क्र.३६/का.३६ दिनांक १० जुलै, २००८ अन्वयें महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदांसाठी अर्ज करता येईल. | सदर उमेदवारांनी ८६५ गावांतील १५ वर्षाचे वास्तव्य असलेल्या रहिवाशी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे अनिवार्य राहिल. |

### (६) वयोमर्यादा

**अ)**

१) उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास अर्ज केलेल्या पदाकरीता विहित वयोमर्यादा आणि आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

२)अर्ज सादर करण्याचे अंतिम दिनांकास उमेदवारांचे वय १८ पेक्षा कमी नसावे.

३) अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकास खुल्या प्रवर्गातील उमेदवारांचे वय ३८ वर्ष पेक्षा जास्त नसावे.

४) अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकास दिव्यांग उमेदवारांचे बाबत ४५ वर्ष पेक्षा जास्त नसावे.

**ब) सामाजिक व समांतर आरक्षणानुसार विहित वयोमर्यादेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण/समांतर आरक्षण | शासन नियमानुसार कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | दिव्यांग उमेदवार | ४५ वर्षे |
| २ | अंशकालीन कर्मचारी | ५५ वर्षे |
| ३ | माजी सैनिक | सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र. २७९/१०/१६ अ दिनांक २० ऑगस्ट २०१० अन्वयें उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्ष इतकी कमाल वयोमर्यादा राहिल. तसेच दिव्यांग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील. |

**७) रत्नागिरी जिल्हा परिषदेकडील आरोग्य विभागाशी संबंधित आरोग्य पर्यवेक्षक, औषध निर्माता, आरोग्य सेवक (पुरुष) व आरोग्य सेवक (महिला) या संवर्गातील पदभरती करीताचे वेळापत्रक**

| अ.क्र. | कालबध्द कार्यक्रम | कालावधी | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | माहे, २०१९ मध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांबाबत...<br>एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी जिल्हयाचा विकल्प देणे/सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाच्या (एसईबीसी) उमेदवारांनी विकल्प देणे/सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) उमेदवारांकडून प्राप्त विकल्पानुसार खुल्या प्रवर्गाचा विकल्प देणाऱ्या/खुल्या प्रवर्गात गणना होणाऱ्या खुल्या प्रवर्गासाठीच्या वयोमर्यादेत पात्र होणाऱ्या एसईबीसी उमेदवारांकडून परिक्षा शुल्क आकारणे/ज्या सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास उमेदवारांनी ईडब्ल्युएस प्रवर्गाचा विकल्प दिला आहे त्यांनी ईडब्ल्युएस प्रमाणपत्र सादर करणे. दिव्यांगाच्या आरक्षणात बदल होत असल्याने अर्ज सादर केलेल्या दिव्यांग उमेदवारांनी नव्याने निश्चित कलेल्या दिव्यांग आरक्षणानुसार विकल्प देणे/नव्याने समाविष्ट दिव्यांग उमेदवाराने यापूर्वी खुल्या अथवा इतर प्रवर्गातून अर्ज केला असल्यास सदर उमेदवारानी दिव्यांग आरक्षणाचा विकल्प देणे. | २ आठवडे | ०१ सप्टेंबर, २०२१<br>ते<br>१४ सप्टेंबर, २०२१ |
| २ | नव्याने समाविष्ट दिव्यांग तसेच नव्याने वाढलेल्या खुल्या प्रवर्गातील रिक्त जागांसाठी उमेदवारांनी (वरील कोष्टक क्र.३ अ व ब मधील नमूद पदांकरीता) ऑनलाईन अर्ज करणे. | ३ आठवडे | ०१ सप्टेंबर, २०२१<br>ते<br>२१ सप्टेंबर, २०२१ |
| ३ | पात्र उमेदवारांचे परीक्षा प्रवेशपत्र तयार करुन संबंधित उमेदवारांना डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध करुन देणे. | १० दिवस | ०६ ऑक्टोबर, २०२१<br>ते<br>१५ ऑक्टोबर, २०२१ |
| ४ | परिक्षेचे आयोजन -<br>औषध निर्माता (दुपारी ३.०० ते ५.०० वा.) | .. | १६ ऑक्टोबर, २०२१ |
| | आरोग्य सेवक (पुरुष) (सकाळी ११.०० ते १.००)<br>आरोग्य सेवक (महिला) (सकाळी ११.०० ते १.००)<br>आरोग्य पर्यवेक्षक (दुपारी ३.०० ते ५.०० वा.) | | १७ ऑक्टोबर, २०२१ |
| ५ | लेखी परिक्षेनंतर Answer Key प्रसिध्द करणे/उमेदवारांना Objection filing साठी किमान ३ दिवसाचा वेळ देणे/अंतिम निकाल जाहिर करणे/पात्र उमेदवारांची यादी जाहिर करणे व त्या अनुषंगाने नियुक्ती आदेश देणे. | २ आठवडे | १८ ऑक्टोबर, २०२१<br>ते<br>०१ नोव्हेंबर, २०२१ |

**८) ऑनलाईन अर्ज भरण्याची कार्यपध्दती आणि सूचना :-**

| | |
|---|---|
| १) | उमेदवाराला www.maharddzp.com या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल. उमेदवाराने संकेतस्थळावरील आपल्या उजव्या बाजूला असलेल्या 'सूचना' या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करुन यूजर नेम, पासवर्ड आणि इमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित इमेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या/तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे. (Activation लिंक ही २ दिवसांकरिता activate असेल) उमेदवाराने त्याची/तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजर नेम आणि पासवर्ड वापरुन केव्हाही लॉग इन होता येईल.<br>टीप : USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल. |
| २) | उमेदवाराचे नाव, वडीलांचे, पतीचे नाव, आडनाव, वडीलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर भरावी लागेल. |
| ३) | छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती - कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी 200 pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अर्जामध्ये अपलोड करा. स्वाक्षरी प्रतिमेची उंची 60 pixel आणि रुंदी 140 pixelअसावी. दोन्ही प्रतिमेचे आकारमान 3 KB ते 50 KB च्या दरम्यान असावे (टिप :- उमेदवाराने अलीकडील छायाचित्र (फोटोग्राफ) अपलोड करणे आवश्यक आहे.) |

| | |
|---|---|
| | उमेदवाराने काळया शाईच्या पेनाने पांढऱ्या कागदावर स्वाक्षरी करुन संकेतस्थळावर ज्या ठिकाणी स्वाक्षरी अपलोड करणे आवश्यक आहे तेथेच अपलोड करणेत यावी. अर्जासोबत अपलोड केलेली स्वाक्षरी व उपस्थिती पत्रावरील स्वाक्षरी भिन्न असेल तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.<br>उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज अवैध ठरविण्यात येईल. |
| ४) | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ.सहीत माहिती भरावी. |
| ५) | त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने/तिने आपला जात प्रवर्ग निवडावा.<br>उमेदवाराने आपल्या जात प्रवर्गाची निवड करण्या आधी जाहिरात वाचणे अपेक्षित आहे. ऑनलाईन पद्धतीने आवेदनअर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातींचे काळजीपूर्वक वाचन करावे. जाहिरातीतील सूचना पूर्णपणे वाचूनच ऑनलाईन अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी स्वतः घ्यावी . |
| ६) | ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी. तसेच उमेदवाराने आधार क्रमांक/आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी. समांतर आरक्षण (लागू असल्यास) त्यासबंधीची माहिती द्यावी. तसेच उमेदवार शारीरिकदृष्टया विकलांग असल्यास त्याला आपल्या विकलांगतेचा प्रकार निवडणे आवश्यक आहे. |
| ७ | तसेच मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य, दिव्यांगत्त्वाचा प्रकार यासंबंधीची माहिती दयावी लागेल. |
| ८) | शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे. तसेच पदाच्या अर्हतेनुसार आवश्यक ती शैक्षणिक माहिती देणे आवश्यक आहे. तरच आपणास त्या पदासाठी अर्ज करता येईल. |
| ९) | एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की, अर्जदाराला 'पुढे' या बटणावर क्लिक करावे लागेल. त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशिल संपादित करण्याची परवानागी दिली जाणार नाही. |
| १०) | त्यानंतर उमेदवारास पदांची निवड करावी लागेल.<br>उमेदवार एकाच अर्जामध्ये पात्र असलेल्या (जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक पात्रता, वयाची अर्हता आणि अन्य अर्हता विचारात घेवून) सर्व पदांना (इच्छूक असल्यास ) अर्ज करू शकतो. त्यामूळे पदांनुसार वेगळा अर्ज भरण्याची आवश्यकता नाही. परंतु, प्रत्येक पदासाठी त्याला स्वतंत्र परीक्षा शुल्क आकारले जाईल. |

| अ.क्र. | पदाचे नाव इंग्रजी मध्ये | पदाचे नाव मराठी मध्ये |
|---|---|---|
| १ | Pharmacist | औषध निर्माता |
| २ अ | Health Worker (Male) (Male Seasonal Spraying Field Worker) | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी क्षेत्र फवारणी कर्मचारी |
| २ ब | Health Worker (Male) | आरोग्य सेवक (पुरुष) |
| ३ | Health Worker (Female) | आरोग्य सेवक (महिला) |
| ४ | Health Supervisor | आरोग्य पर्यवेक्षक |

| | |
|---|---|
| ११) | त्यानंतर उमेदवाराने त्या पदासाठी आवश्यक असलेली व धारण करीत असलेल्या पात्रतेबद्दलची माहिती देवून ती सेव्ह करणे आवश्यक आहे. |
| १२) | उमेदवाराने सगळया नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाईन पध्दतीने आवश्यक ते परीक्षा शुल्क भरणा करावे. परीक्षा शुल्क भरणा हा फक्त ऑनलाईन पध्दतीनेच (नेट बँकींग, क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड, ई-वॉलेट, भारतीय स्टेट बँकेच्या चलनाद्वारे) करता येईल. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट काढण्याचा पर्याय असेल. |
| १३) | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस मध्यरात्री 11.59 P.M. वाजल्यानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल. |
| १४) | जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉग इन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकीट, परीक्षेस उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल. कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी www.maharddzp.com ला भेट दयावी किंवा ०७२९२००६३०५ या भ्रमणध्वनी वर कॉल करावा. |

| | |
|---|---|
| | नोंद :- नोंदणी मधील तपशिल जसे की वापरकर्ता नाव (USERNAME), ई मेल आयडी, निवडलेले पद, जन्मतारीख, उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी, शैक्षणिक पात्रतेचा तपशिल, इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. |

**९) अर्जातील माहितीचे पुनर्विलोकन :-**

| | |
|---|---|
| १) | युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो. |
| २) | ऑनलाईन अर्जाची प्रिंट काढण्यासाठी ' प्रिंट प्रिव्हयू ' या पर्यायावर क्लिक करा.<br>नोंद:उमेदवाराने आपला PDF स्वरूपातील अर्ज,परीक्षा प्रवेश पत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वतःजवळ ठेवावा. |
| ३) | **प्रत्येक अर्जदाराने केलेल्या ऑनलाईन अर्जाची पीडीएफ प्रत डाऊनलोड करुन त्याची प्रत (hard copy) पदभरती प्रक्रिया व नोंदणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जतन करुन ठेवणेची आहे. जर अर्जदाराने अर्जाच्या फॉर्मची पीडीएफ प्रत नोंदणी स्क्रीन वरुन डाऊनलोड केली नसेल अथवा ती हरवली असेल तर त्यास परीक्षा घेणारी संस्था (Exam conducting bodies)/परीक्षा प्राधिकरण (Exam authorites)/मे.न्यास कम्युनिकेशन प्रा.लि. अथवा नियुक्ती प्राधिकारी (Appointing Authorites) जबाबदार राहणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.** |
| ४) | **प्रत्येक उमेदवाराने प्रवेशपत्राची पीडीएफ प्रत डाऊनलोड करुन त्याची प्रिंट (hard copy) पदभरती प्रकिया व संबंधित नोंदणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जतन करुन ठेवणेची आहे. जर उमेदवाराने हॉल तिकीटाची पीडीएफ प्रत नोंदणी स्क्रीन वरुन डाऊनलोड केली नसेल अथवा ती हरवली असेल तर त्यास परीक्षा घेणारी संस्था (Exam conducting bodies)/परीक्षा प्राधिकरण (Exam authorites)/ मे.न्यास कम्युनिकेशन प्रा.लि. अथवा नियुक्ती प्राधिकारी (Appointing Authorites) जबाबदार राहणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.** |
| ५) | परीक्षा संपल्यानंतर हॉल तिकीट डाऊनलोड करण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही, याची उमेदवारांनी स्पष्ट नोंद घ्यावी. |

**१०) महत्त्वाच्या सूचना :-**

| | |
|---|---|
| १) | १) उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही.<br>२) परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थिती मध्ये (वैद्यकीय किंवा इतर कारणांसाठी सुध्दा) स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.<br>३) उमेदवाराने एका पदासाठी फक्त एकदाच अर्ज करावा, जर एका उमेदवाराने **एका पदासाठी एकापेक्षा अधिक** अर्ज केलेले आहेत असे आढळून आले, तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.<br>४) उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थिती मध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी कारणांसाठी) परत केले जाणार नाही.<br>५) परीक्षेच्या वेळी उमेदवाराने खालील पैकी सध्याचे वैध फोटो ओळखपत्र पुरावा म्हणुन सोबत ठेवणे आवश्यक आहे.<br>(१) पॅनकार्ड, (२) पासपोर्ट, (३) वाहन अनुज्ञप्ती (४) मतदार ओळखपत्र<br>(५) फोटोसह राष्ट्रीयकृत बँकपासबुक (६) मूळ आधारकार्ड |
| २) | उमेदवारास विभागीय परीक्षा तसेच हिंदी व मराठी परीक्षा तत्संबंधी नियमानुसार परीक्षा पूर्वीच उत्तीर्ण झाला नसल्यास किंवा त्या उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आली नसल्यास त्याला/तिला परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल. |
| ३) | उमेदवारांना ऑनलाईन/व्यावसायिक परिक्षेस तसेच मूळ कागदपत्रांच्या छाननीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा भत्ता देय राहणार नाही. |
| ४) | निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. |
| ५) | उमेदवारांची जिल्हा परिषद सेवेसाठी निवड होवून नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सेवाप्रवेशोत्तर परीक्षा, विभागीय परीक्षा आणि इतर परीक्षा व प्रशिक्षण विहित संधीत व विहित कालावधीत उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा शासनाने वेळोवळी विहित केलेप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्टात आणणे इत्यादी कारवाई केली जाईल. |
| ६) | निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात नमूद केलेली माहिती/अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे/उमेदवाराने सादर केलेली माहिती वस्तुस्थितीदर्शक नसल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास केलेली निवड/नेमणूक रद्द केली जाईल. |
| ७) | फक्त याच जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने या कार्यालयास प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. |

| | |
|---|---|
| ८) | निवडणूक अथवा नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य काही कारणामुळे विहित दिवशी परीक्षा घेणे शक्य झाले नाही तर सोयीच्या अन्य दिवशी परीक्षा घेतली जाईल. |
| ९) | अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. |
| १०) | **उक्त जाहिरातीमध्ये घोषित केलेल्या पदांकरीता मुलाखती नसलेने प्रथम अंतरिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. मूळ कागदपत्रांचे छाननी अंती व आक्षेप/हरकतींचा विचार करुन अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल.** |
| ११) | या परीक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची आवश्यकता नसली तरीही ज्या उमेदवारांकडे अर्ज करतेवेळी पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी अर्ज करु नयेत. |
| १२) | **उपलब्ध असलेल्या क्षमतेनुसार परीक्षा केंद्राचे वाटप केले जाईल. याबाबत कोणालाही आक्षेप नोंदविता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.** |
| १३) | **अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी आल्यास त्यासाठी ०७२९२००६३०५ या क्रमांकावर संपर्क साधावा.** |

**११) विशेष सूचना :-**

| | |
|---|---|
| १) | शासन निर्णय वित्त विभाग क्र.अनियो/१००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१.१०.२००५ अन्वयें लागू केलेली दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्या उमेदवारांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना समाप्त करुन सद्या शासनाने नव्याने दिनांक ०१.०४.२०१५ पासून लागू केलेली राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना उमेदवारांना लागू राहील. मात्र सद्या अस्तित्वात निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना उमेदवारांना लागू होणार नाही. |
| २) | निवड झालेल्या उमेदवारांना प्रशासकीय सोय विचारात घेऊन उपलब्ध असलेल्या रिक्त पदी प्रथम पदस्थापना देण्यात येईल. उमेदवारांनी पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारे सक्षम प्राधिकाऱ्यांवर दबाव आणल्यास त्यांचे नाव निवड यादीतून कमी करण्यात येईल. |
| ३) | पात्रता परीक्षेचे प्रवेशपत्र व परीक्षेसंबंधी सुचना या केवळ संकेत स्थळावरूनच उपलब्ध करण्यात येणार असल्याने व मोबाईल एसएमएसव्दारे/ईमेलव्दारे सुचना निर्गमीत करण्यात येणार नसल्याने उमेदवारांनी सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रमाबाबत अद्यावत राहण्याची व पात्रता परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. |
| ४) | सदर पदभरतीचे नियम/निकषांमध्ये पदभरती पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या शासन निर्णय/परीपत्रक/अधिसुचना यानुसार बदल होऊ शकतो. |

**१२) समांतर आरक्षणाचे अनुषंगाने महत्त्वाच्या सूचना :-**

| | |
|---|---|
| १) | **दिव्यांग ४%** :-<br>अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपुर्ण सहभाग) अधिनियमातील तरतुदी, शासन परिपत्रक साप्रवि दिनांक ०२.०५.१९९८, शासन परिपत्रक दिनांक ०६.०५.२००४, ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक अपंग-२०१०/प्र.क्र.२५०/आस्था-९, दिनांक १४ जानेवारी, २०११, शासन परिपत्रक दिनांक २८.०७.२०१४ आणि शासन शुध्दीपत्रक क्रमांक अपंग-२०१/प्र.क्र.२५७/आस्था-८, दि.२९ डिसेंबर, २०१८ मधील तरतुदी नुसार दिव्यांग उमेदवारांना आरक्षणाच्या तरतुदी नुसार लागु असलेले प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.<br>**शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक अपंग-२००७/प्रक्र.६११/सुधार-३, दिनांक २० एप्रिल, २००७ शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक न्याय-२००७/स.न्या/प्र.क्र.१०३ (भाग-३/१६-अ, दिनांक १९ ऑक्टोंबर, २००७ तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अपंग-१००९/प्र.क्र.२७६/०९/१६-अ, दिनांक १९ मार्च, २०१० अन्वये विहीत करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार विकलांग व्यक्तीसाठी आरक्षित असलेल्या पदावर सरळसेवेने निवड करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता विकलांग गुणवत्ताक्रमानुसार प्रथम त्याची निवड करण्यात येईल व निवड केल्यानंतर सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल, त्या सामाजिक प्रवर्गात उमेदवारास सामावून घेण्यात येईल.**<br>**लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत**<br>दिव्यांग प्रवर्गातुन अर्ज करणाऱ्या उमेदवाराकडे किमान ४० टक्के दिव्यांग असल्याचे सक्षम वैद्यकिय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ दिनांक २९ मे |

| | |
|---|---|
| | २०१९ तसेच ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०१९/प्र.क्र.१४१/आस्था-८ दिनांक २२ फेब्रुवारी २०२१ नुसार पात्रतेचे निकष धारण करणारे विकलांग उमेदवार गुणवत्तेनुसार पात्र असतील. शासन परिपत्रक दि. १८.०३.२०१४ अन्वये अपंग उमेदवारांस लेखनिकांची मदत आवश्यक असल्यास ऑनलाईन अर्ज भरताना तसा स्पष्ट उल्लेख करावा. उमेदवाराने स्वत: लेखनिक/ सहाय्यकाची व्यवस्था करणे आवश्यक राहिल. जे उमेदवार लेखनिक / सहाय्यक हा पर्याय निवडतील त्यांना प्रवेशपत्रासोबत लेखनिक घोषणापत्र प्राप्त होईल. सदरील घोषणापत्र उमेदवाराने राजपत्रित अधिकारी यांचेकडुन सांक्षांकित करुन घेऊन परीक्षेच्या वेळी सोबत आणणे बंधनकारक राहिल.<br>ज्या उमेदवारांनी लेखनिकाची अर्जात मागणी केलेली नसेल अशा दिव्यांग उमेदवारांना सदर सवलतीचा लाभ मिळणार नाही याची नोंद घ्यावी. |
| २) | **<u>माजी सैनिक</u>**<br>शासन परिपत्रक साप्रवि क्र. आरटीए१०७९/४८२/१६-अ दिनांक १६.०४.१९८१ अन्वये माजी सैनिक उमेदवारांना समांतर आरक्षण लागु करण्यात आले आहे. माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सैन्यात काम केल्या बाबतचे आवश्यक कागदपत्र व जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केले असल्या बाबत प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे अभिलेख प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही. तसेच सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.आरटीए ९०९०/६२/प्र.क्र. २२२/९१/२८ दि. ३० डिसेंबर १९९१ अन्वये माजी सैनिकांना शासन सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी देण्यात येणाऱ्या सवलतीचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणुकीसाठी दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येणार नाही.<br>सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक ०२.०९.१९८३ नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसतांना सैनिक सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व येवून त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुंटूंबातील फक्त एका व्यक्तीला नियुक्ती देणेचे धोरण आहे व त्यांचा १५ टक्के समांतर आरक्षणातून विचार करणेत येईल. |
| ३) | **<u>अंशकालीन कर्मचारी</u>**<br>सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. २७ ऑक्टोंबर २००९ अन्वये पदविधर/पदविकाधारक अंशकालीन या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी 'सुशिक्षीत बेरोजगारांना आर्थिक सहाय्य' या योजने अंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षे काम केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये सदर अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे व तशी नोंद ऑनलाईन अर्जात नमुद करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. अंशकालीन उमेदवाराने एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्याच उमेदवारांस पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही, तसे आढळल्यास कोणत्याही वेळी निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. |

## १३) इतर सर्वसाधारण सूचना :-

| | |
|---|---|
| १) | ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवा योजन कार्यालय, समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहीत मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा इच्छुक व पात्र उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारांत घेतले जाणार नाहीत. अशा उमेदवारांना कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही. |
| २) | अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेला अंशकालीन सेवेचा कालावधी, सेवेत प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही. |
| ३) | शासकीय /निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबंधित नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाचा आहे. अशी परवानगी प्राप्त केल्याची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. |
| ४) | ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे पात्रता परिक्षेस बसण्याचा/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास किंवा खोटी माहिती पुरविल्यास अथवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. |
| ५) | निवड प्रक्रिया सुरू झाल्या नंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारानी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती बाद करण्यात येईल व शासनाची दिशाभूल केल्या प्रकरणी सदर उमेदवारा विरूध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ६) | चारित्र्य-पूर्वचारित्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहाणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील. |
| ७) | निवड झालेल्या उमेदवारांनी आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमीपत्र इत्यादींची पुर्तता विहित मुदतीत करून देणे आवश्यक राहील. तसेच त्या प्रमाणपत्रांची पडताळणी विहित पध्दतीनुसार करून घेणे बंधनकारक राहील. सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नियमानुसार आवश्यक ती सेवाप्रवेशोत्तर परीक्षा/प्रशिक्षण विहित मुदतीत उत्तीर्ण/पूर्ण करणे आवश्यक राहील. |
| ८) | अपरिहार्य कारणास्तव किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा शासन आदेशाने विहित दिनांकास परीक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्या प्रमाणे सोईच्या दिवशी परीक्षा घेण्यात येईल. या बाबत उमेदवारांना संकेतस्थळाव्दारे कळविण्याची जबाबदारी मे.न्यास कम्युनिकेशन प्रा.लि. यांची तर वर्तमानपत्रातुन कळविण्याची जबाबदारी नियुक्ती प्राधिकारी/संबंधित जिल्हा परिषद यांची राहिल. |
| ९) | परीक्षेस, कागदपत्र पडताळणीस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. |
| १०) | निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल. वैद्यकीय अहवाल प्रतिकुल असल्यास केलेली निवड व नेमणुक रद्द करण्यात येईल. |
| ११) | वरील अटी व शर्ती नियमाव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळो निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहतील. |
| १२) | जाहिराती मधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील. |
| १३) | **समानगुण आणि आत्महत्याग्रस्त शेतक-याचे पाल्य :- उमेदवारांना समान गुण मिळाल्यास उमेदवारांचा गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्रनिमं-१२१६/प्र.क्र.६५/१६/१३-अ, दिनांक १३ जून, २०१८ मधील तरतुदीनुसार निश्चित करणेत येईल. यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.** |
| १४) | सामान्य प्रशासन विभाग पुरकपत्र क्र.प्रानिमं-२०१७/(प्र.क्र.९२/१७)/१३-अ, दिनांक ५.१०.२०१५ मधील तरतुदी नुसार ऑनलाईन परीक्षेमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीत समावेश करतांना आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार अशा उमेदवारांकडे अर्ज करतेवेळी संबंधित जिल्हास्तरीय समितीने त्यास कुटूंबातील मृत शेतक-याचा पाल्य म्हणुन पात्र ठरविण्या बाबतचा पुरावा साक्षांकित प्रतिसह कागदपत्र छाननीच्या वेळी पडताळणी समितीस उमेदवाराने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. |
| १५) | पदभरतीची प्रक्रिया ही अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असलेने उमेदवारांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये. |

## १३) परीक्षेस प्रवेश :-

| | |
|---|---|
| १) | पात्रता परीक्षा व कागदपत्र पडताळणीसाठी येण्या-जाण्यासाठी येणारा खर्च उमेदवारास स्वत: करावा लागेल. |
| २) | फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशपत्र, ओळखीचा मुळ पुरावा व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेशपत्रावरील सुचनेनुसार परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल. |
| ३) | डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंर्तभुत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्ल्यू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची कोणतीही साधने/साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. |
| ४) | परवानगी नाकारलेल्या कोणत्याही प्रकारचे साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशव्दारावरच ठेवावे लागेल. अशा साधन /साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. या संदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद प्रशासन किंवा परीक्षा केंद्र व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही. |

सही /- XX
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी तथा
सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती.

सही /- XX
जिल्हा समाजकल्याण अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी तथा
सदस्य, जिल्हा निवड समिती.

सही /- XX
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.)
जिल्हा परिषद रत्नागिरी तथा
सदस्य, जिल्हा निवड समिती.

सही /- XX
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी तथा
सदस्य, जिल्हा निवड समिती.

सही /- XX
जिल्हाधिकारी
रत्नागिरी तथा
अध्यक्ष, जिल्हा निवड समिती.